कोहली धावांसाठी प्रेरित!

ऑस्ट्रेलियातील पूर्वीचे यश आत्मविश्वास वाढवणारे; सुनील गावस्करांचे मत

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

ऑस्ट्रेलियाच्या योजना कोहलीला ठाऊक -मांजरेकर

आपल्याविरुद्ध ऑस्ट्रेलियाची काय योजना असेल हे कोहलीला ठाऊक आहे. त्याला पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरावे लागेल, असे मत भारताचे माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी मांडले. ''ऑस्ट्रेलियाचे गोलंदाज डावाच्या सुरुवातीला कोहलीला उजव्या यष्टिच्या बाहेर चेंडू टाकून 'ड्राइव्ह' मारण्यास प्रवृत्त करतील.त्याची मानसिकता तपासून पाहतील. त्याला मार्ग शोधून काढावा लागेल,'' असे मांजरेकर म्हणाले.

न्यूझीलंडविरुद्ध आलेल्या अपयशानंतर विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेत खोऱ्याने धावा करण्यासाठी प्रेरित असेल. कोहलीने ऑस्ट्रेलियात यापूर्वी यशस्वी कामगिरी केली आहे. याचा त्याला निश्चितपणे फायदा होईल आणि त्याचा आत्मविश्वास वाढेल, असे मत भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले.

कोहलीला गेल्या काही महिन्यांपासून आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये तो झगडताना दिसत आहे. गेल्या ६० कसोटी डावांत त्याला केवळ दोन शतके आणि ११ अर्धशतके करता आली आहेत. या वर्षी खेळलेल्या सहा कसोटींत त्याला केवळ २२.७२च्या सरासरीने धावा करता आल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील तीन सामन्यांत मिळून तो ९३ धावाच करू शकला होता. कोहलीच्या कामगिरीची भारतीय संघाला चिंता असेल, अशी टिप्पणी ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंगने केली होती. मात्र, कोहलीला सूर गवसेल याची गावस्करांना खात्री वाटते.

''न्यूझीलंडविरुद्ध कोहलीला चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे त्याची धावांची भूक वाढली असेल. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात ॲडलेड येथे झालेल्या कसोटीत, ज्याच्या दुसऱ्या डावात भारतीय संघ ३६ धावांत गारद झाला होता, त्या कसोटीच्या पहिल्या डावात कोहलीने ७० हून अधिक धावा केल्या होत्या. तसेच कोणत्या गोलंदाजाने त्याला बाद केले नव्हते, तर तो धावचीत झाला होता. ऑस्ट्रेलियात त्याने यापूर्वी दमदार कामगिरी केली आहे. आताही तो धावा करण्यासाठी प्रेरित असेल,'' असे गावस्कर म्हणाले.

कोहलीने याआधी चार वेळा ऑस्ट्रेलियाचा दौरा केला असून यात १३ कसोटींच्या २५ डावांत ५४.०८च्या सरासरीने १३५२ धावा केल्या आहेत. यात सहा शतके आणि चार अर्धशतकांचा समावेश आहे. या आकड्यांकडे पाहून कोहलीला बळ मिळेल, असे गावस्करांना वाटते.

''कोहलीने ॲडलेडमध्ये सातत्याने धावा केल्या आहेत. ॲडलेडच्या आधी भारताला पर्थमध्ये कसोटी सामना खेळायचा आहे. या मैदानावर कोहलीने २०१८-१९च्या मालिकेत उत्कृष्ट शतक साकारले होते. ती त्याच्या कारकीर्दीतील सर्वोत्तम खेळींपैकी एक होती. या मैदानांवर यापूर्वी यशस्वी कामगिरी केल्याने कोहलीचा आत्मविश्वास निश्चितपणे वाढेल. कोहलीला चांगली सुरुवात मिळाली, तर त्याला रोखणे ऑस्ट्रेलियाला अवघड जाईल. तो मोठी खेळी करू शकेल,'' असेही गावस्कर यांनी नमूद केले.

अश्विनकडून खूप शिकण्यासारखे -लायन

पर्थ : प्रतिस्पर्धी संघातील खेळाडू हे बरेचदा सर्वोत्तम प्रशिक्षक ठरतात. त्यांचा खेळ पाहून तुम्हाला नव्या गोष्टी शिकायला मिळतात. माझ्यासाठी रविचंद्रन अश्विन असा शिक्षक ठरला आहे. त्याच्याकडून मला खूप शिकायला मिळाले आहे, अशी स्तुती ऑस्ट्रेलियाचा अनुभवी फिरकीपटू नेथन लायनने केली.

एकाच वर्षी (२०११) कसोटी पदार्पण केल्यापासून अश्विन आणि लायन हे विश्वातील दोन सर्वोत्तम फिरकीपटू म्हणून लौकिक राखून आहेत. हे दोन ऑफ-स्पिनर आता आठव्यांदा एकमेकांविरुद्ध कसोटी मालिकेत खेळणार आहेत. प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावस्कर करंडकासाठी पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोनही

संघांसाठी आपल्या अनुभवी फिरकीपटूंची भूमिका महत्त्वाची ठरू शकेल.

''अश्विन फारच उत्कृष्ट गोलंदाज आहे. कारकीर्दीत आम्ही अनेकदा एकमेकांविरुद्ध खेळलो आहे. त्यामुळे मला अश्विनकडून खूप शिकता आले आहे. गोलंदाज म्हणून तो फार हुशार आहे. परिस्थिती आणि खेळपट्टीशी जुळवून घेण्यास त्याला वेळ लागत नाही. केवळ सर्वोत्तम गोलंदाजांनाच हे जमू शकते. त्याची गुणवत्ता आणि कौशल्याचा भारताला मोठा फायदा झाला आहे,'' असे लायन म्हणाला.

भारतीय महिला संघाचेच पारडे जड!

आशियाई चॅम्पियन्स करंडकाच्या उपांत्य फेरीत आज जपानशी गाठ

राजगीर (बिहार) : साखळीतील अखेरच्या सामन्यात जपानवर विजय मिळवल्यानंतर आशियाई चॅम्पियन्स हॉकी स्पर्धेत आज, मंगळवारी होणाऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत भारतीय महिला संघासमोर पुन्हा याच प्रतिस्पर्धीचे आव्हान असणार आहे. भारतीय संघ स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला असून वेगवान आक्रमण आणि भक्कम बचाव अशा मिश्र रणनीतीसह खेळण्यात त्यांना यश आले आहे.

दीपिकावर भिस्त

दीपिकाने स्पर्धेत सर्वाधिक गोल केले आहेत. एकूण १० गोल तिच्या नावे असून यापैकी पाच गोल तिने पेनल्टी कॉर्नरवर केले आहेत. त्यामुळे जपानविरुद्ध गोल करण्यासाठी भारताची दीपिकावरच भिस्त असेल. मनीषा चौहानची तिला साथ मिळत आहे. संगीता कुमारी, प्रीती दुबे, लालरेमसियामी यांचेही योगदान मोठे आहे. भारतीय संघाने या स्पर्धेत काही सुरेख मैदानी गोल नोंदवले. पेनल्टी कॉर्नरवरही गोल केले. मात्र, या आघाडीवर पूर्ण ताकद दाखविण्यात भारतीय खेळाडू निश्चित कमी पडल्या आहेत. त्यामुळे यात सुधारणेचा भारताचा प्रयत्न असेल.

साखळीतील कामगिरी लक्षात घेता उपांत्य फेरीत भारतीय संघाचेच पारडे जड मानले जात आहे. साखळीत ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या चीनवर विजय मिळवून भारताने आपली ताकद दाखवून दिली होती. गेले वर्षभर मोठ्या विजयाच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीय महिला संघाला प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी पुन्हा एकदा योग्य मार्गावर आणले आहे.

स्पर्धेत उदिता, सुशीला चानू आणि वैष्णवी फाळके या बचाव फळीने प्रत्येक सामन्यात सरस कामगिरी केली आहे. मध्यरक्षक गोल करण्याच्या संधी निर्माण करत आहेत. आक्रमक खेळाडू मध्यरक्षकांच्या प्रयत्नांचे गोलमध्ये रूपांतर करत आहेत. भारतीय गोलरक्षकांची तितकीशी कसोटी लागलेली नाही. सविता पुनिया आणि बिचू देवी खरिबम यापैकी कोणाला संधी मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

- **वेळ : सायं. ४.४५ वा.**
- **थेट प्रक्षेपण : सोनी स्पोर्ट्स टेन १**

ऑस्ट्रेलियाकडून पाकिस्तानचा धुव्वा

ट्वेन्टी-२० मालिकेत निर्भेळ यश; स्टोइनिसची फटकेबाजी

होबार्ट : मार्कस स्टोइनिसने (२७ चेंडूंत नाबाद ६१) केलेल्या तडाखेबंद फलंदाजीच्या जोरावर यजमान ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात सोमवारी पाकिस्तानचा सात गडी आणि ५२ चेंडू राखून धुव्वा उडवला. यासह ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या या मालिकेत ३-० असे निर्भेळ यश संपादन केले.

प्रथम फलंदाजी स्वीकारणाऱ्या पाकिस्तानचा डाव १८.१ षटकांत ११७ धावांत आटोपला. मग ऑस्ट्रेलियाने विजयी लक्ष्य केवळ ११.२ षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात गाठले. स्टोइनिसने आपल्या फटकेबाज खेळीत पाच षटकार आणि पाच चौकारांची आतषबाजी केली. त्याने शाहीन आफ्रिदीच्या एकाच षटकात तीन षटकार लगावत ऑस्ट्रेलियाला झटपट विजय मिळवून दिला.

संक्षिप्त धावफलक

पाकिस्तान : १८.१ षटकांत सर्वबाद ११७ (बाबर आझम ४१, हसीबुल्ला खान २४; आरोन हार्डी ३/२१, ॲडम झॅम्पा २/११, स्पेन्सर जॉन्सन २/२४) पराभूत वि. ऑस्ट्रेलिया : ११.२ षटकांत ३ बाद ११८ (मार्कस स्टोइनिस नाबाद ६१, जोश इंग्लिस २७; अब्बास आफ्रिदी १/१४, जहानबाद खान १/१७)

सात्त्विक-चिरागच्या पुनरागमनाकडे लक्ष

शेन्झेन : बॅडमिंटनमधील भारताची आघाडीची जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी आज, मंगळवारपासून सुरू होणाऱ्या चीन मास्टर्स स्पर्धेतून (सुपर ७५० दर्जा) बॅडमिंटन कोर्टवर पुनरागमन करणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील अपयशानंतर ही जोडी प्रथमच एखाद्या स्पर्धेत उतरणार आहे. सात्त्विकला उद्भवलेल्या खांद्याच्या दुखापतीमुळे या जोडीला अनेक स्पर्धांना मुकावे लागले आहे. मथियास बो यांनी प्रशिक्षकपद सोडल्यानंतर भारतीय जोडी प्रथमच प्रशिक्षकाशिवाय खेळणार आहे. पहिल्या फेरीत सात्त्विक-चिराग जोडीसमोर तैपेइच्या यांग पो सुआन आणि ली झे हुई यांचे आव्हान असेल.

पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन यांच्या कामगिरीवरही भारतीय चाहते नजर ठेवून असतील.

बँकांची कर्ज परवडणारी हवीत!

पियूष गोयल यांच्यापाठोपाठ अर्थमंत्र्यांचाही व्याजदर कपातीसाठी धोशा

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

> **भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या गरजा पाहता महत्त्वाचे काय याबाबत वेगवेगळे मतप्रवाह असू शकतात. या अंगाने असेही म्हणता येईल की, उसनवारीचा खर्च खरोखरच खूपच ताण देणारा आहे. उद्योगधंद्यांची वाढ आणि त्यांच्या क्षमतावाढीची नितांत गरज आहे आणि अशा समयी बँकांचे व्याजदर अधिक परवडणारे असावेत.**
> – **निर्मला सीतारामन**, केंद्रीय अर्थमंत्री

मुंबईः बँकांचे व्याज दर काही जणांसाठी जास्त असून, कर्जे परवडणारी ठरतील हे पाहण्यासाठी बँकांनी पावले उचलण्याची आवश्यकता आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी सूचित केले.

आर्थिक मंदीची शक्यता वर्तविली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर सीतारामन म्हणाल्या की, देशांतर्गत आणि जागतिक आव्हानांची सरकारला पूर्णपणे कल्पना आहे. त्यासाठी अनावश्यक चिंता करण्याची गरज नाही. भारताच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींवर चर्चा व्हायला हवी. कर्जांचा व्याज दर जास्त असल्याचा सूर अनेक जणांकडून व्यक्त होत आहे. उद्योगांना त्यांच्या क्षमता विस्तारासाठी पाठबळ देण्यासाठी, 'विकसित भारता'च्या आकांक्षाना मूर्तरूप देण्यासाठी बँकांनी व्याजाचे दर अधिक परवडणारे करायला हवेत.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित वार्षिक व्यवसाय आणि आर्थिक परिषदेत सीतारामन बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, बँकांनी त्यांच्या मूळ कार्यांवर लक्ष केंद्रित करावे आणि ज्यामुळे कर्जे महाग होत आहेत त्या घटकांना लक्षात घ्यावे.

कपातीसाठी केंद्र आग्रही

बँकांची कर्ज परवडणारी असावीत, पर्यायाने व्याजदर कपात केली जावी, असा अर्थमंत्र्यांचा ताजा आग्रह हा सरकारकडून लावला जात असलेल्या धोशाचेच रूप असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे. गेल्या आठवड्यात केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनीही अर्थवृद्धीला चालना म्हणून रिझर्व्ह बँकेने व्याजदर कपात करावी असे जाहीर विधान करताना, पतधोरण निर्धारणांत खाद्यान्न महागाईकडे दुर्लक्ष केले जावे, असेही सूचित केले. तथापि किरकोळ महागाई ६.२ टक्क्यांवर आणि त्यातही खाद्यान्न महागाई ११ टक्क्यांच्या पातळीवर कडाडली असताना, रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर कपातीची शक्यता नजीकच्या काळात धूसर झाली आहे.

सीतारामन म्हणाल्या, तीन ते चार नाशिवंत कृषी-जिनसांचे दर कडाडल्याने किरकोळ महागाई दर वाढले आहेत. मात्र अन्य वस्तूंच्या किमती आटोक्यात आहेत आणि तीन ते चार टक्क्यांच्या नियंत्रित पातळीवर आहेत. तथापि खाद्यान्न किमतीला महत्त्व द्यावे अथवा नाही किंवा रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण निर्धारण समितीने कोणता निर्णय घ्यावा, या संबंधाने काहीही भाष्य करून, कोणत्याही नव्या वादाला तोंड फोडायची इच्छा नाही, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

आगामी वर्षात २०-२५ अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक बाजारात परतेल

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

भारतात विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकीचा (एफपीआय) प्रवाह आगामी २०२५ मध्ये सकारात्मक राहण्याचा अंदाज असून, बँक ऑफ बडोदाच्या अहवालानुसार ही आवक २० ते २५ अब्ज डॉलरच्या घरात जाणारी असेल. भारतीय भांडवली बाजारातून अलीकडच्या काळात परकीय गुंतवणूक वेगाने बाहेर पडत असली तरी अहवालाच्या मते, हा कल तात्पुरत्या स्वरूपाचा आहे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील देशाच्या मजबूत आर्थिक मूलभूत स्थितीमुळे परकीय गुंतवणुकीचा ओघ पुन्हा बहरलेला दिसून येईल.

अहवालात म्हटले आहे की, भारताची बाह्य तूट आणि वित्तीय तूटदेखील नियंत्रणात आहे, तर आर्थिक वाढीचा दर दमदार राहिला आहे. रिझर्व्ह बँकेने ६७५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त परकीय चलन राखीव गंगाजळी तयार केली आहे. जिला आवश्यकता भासल्यास देशांतर्गत चलनाला पाठबळ देण्यासाठी धोरणात्मकरीत्या तैनात केले जाऊ शकते.

भारतासह उदयोन्मुख बाजारपेठांमधून परदेशी गुंतवणूकदारांकडून अलीकडेच दिसून आलेली भांडवलाची माघार ही प्रतिकूल जागतिक घडामोडींवरील प्रतिक्रिया या स्वरूपाची आहे. या प्रतिकूल घटकांमध्ये अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर कपातीच्या चक्राभोवती असलेल्या अपेक्षांबाबत अनिश्चितता आणि डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून पुन्हा निवडीनंतर निर्माण झालेल्या राजकीय अनिश्चिततेचा समावेश आहे. मात्र अमेरिकेत वित्तीय आणि पतविषयक धोरणांसंबंधाने स्पष्टतेनंतर आता माघारी जात असलेला पैसा पुन्हा परतेल, असा अहवालाने विश्वास व्यक्त केला आहे.

प्रत्यक्ष कर संकलन उद्दिष्टापेक्षा अधिक होईल!

पीटीआय, नवी दिल्ली

चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर संकलन २२.०७ लाख कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात निर्धारित उद्दिष्टापेक्षा अधिक होईल, असा विश्वास केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे (सीबीडीटी) अध्यक्ष रवी अगरवाल यांनी सोमवारी व्यक्त केला.

इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअरमध्ये करदाते दालनाचे उद्घाटन केल्यानंतर अगरवाल बोलत होते. ते म्हणाले की, प्राप्तिकर विवरणपत्रात परदेशातील संपत्तीचे तपशील न देणाऱ्या करदात्यांना आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी सुधारित विवरणपत्रे भरण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत दिली गेली आहे. उच्च मूल्य मालमत्तांचे तपशील विवरणपत्रात न देणाऱ्या करदात्यांना लघुसंदेश आणि ई-मेल पाठविण्याची प्रक्रिया प्राप्तिकर विभागाने सुरू केली आहे. यंदा अर्थसंकल्पीय उद्दिष्टापेक्षा प्रत्यक्ष कर संकलन अधिक असेल, असा आमचा विश्वास आहे. कंपनी कर आणि बिगरकंपनी करात झालेली वाढ यास कारणीभूत ठरेल.

प्राप्तिकर कायद्यातील भाषा सोपी आणि सहजपणे समजणारी असावी, यासाठी करदात्यांच्या सूचना व हरकत्या मागविल्या गेल्या. आतापर्यंत सहा हजारांहून अधिक सूचना आमच्याकडे आलेल्या आहेत. करदात्यांना पुढे येऊन त्यांना प्राप्तिकर कायद्यात आवश्यक वाटणारे बदल सुचवावेत. त्यांच्या सूचनांच्या आधारे आम्ही प्राप्तिकराची जगातील उत्कृष्ट पद्धती आणली जाईल, असेही अगरवाल यांनी स्पष्ट केले.

सप्टेंबर तिमाहीत शहरी बेरोजगारीचा टक्का ६.४ टक्क्यांवर

पीटीआय, नवी दिल्ली

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार (एनएसएसओ), सरलेल्या जुलै ते सप्टेंबर तिमाहीत शहरी भागातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांमधील एकूण बेरोजगारीचा दर ६.४ टक्क्यांवर घसरला आहे. याआधीच्या तिमाहीत म्हणजेच एप्रिल ते जून दरम्यान हा दर ६.६ टक्के पातळीवर होता.

देशातील एकूण श्रमशक्तीत रोजगार नसलेल्यांच्या प्रमाणावरून बेरोजगारी किंवा बेरोजगारीचा दर ठरविला जातो. गेल्या वर्षी याच जुलै ते सप्टेंबर तिमाहीतदेखील शहरी बेरोजगारीचे प्रमाण ६.६ टक्क्यांवर होते.

जुलै ते सप्टेंबर २०२४ मध्ये शहरी महिलांमधील बेरोजगारीचा दर वर्षापूर्वीच्या याच तिमाहीतील ८.६ टक्क्यांवरून ८.४ टक्क्यांवर घसरला आहे. आधीच्या म्हणजेच, एप्रिल ते जून २०२४ मध्ये हा दर ९ टक्के होता. शहरी पुरुषांमध्ये, सरलेल्या तिमाहीत बेरोजगारी ६ टक्क्यांवरून ५.७ घसरली आहे, वर्षापूर्वी याच तिमाहीत तिचे प्रमाण ६ टक्के होते. पुरुष व महिला मिळून एकत्रित बेरोजगारीचा दर ६.४ टक्क्यांवर घसरल्याचे सर्वेक्षणाने म्हटले आहे. 'एनएसएसओ'ने एप्रिल २०१७ पासून नियतकालिक श्रमशक्तीच्या सर्वेक्षणाची पद्धत सुरू केली आहे आणि यंदाची ही सर्वेक्षणाची २४ वी फेरी आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर पिन ४२३ १०९
फोन नं. (०२४२३) - २५८६८० फॅक्स नं. २५८८७०
वेबसाईट :- www.sai.org.in, ई-मेल : hospital.bmw@sai.org.in

ई-निविदा

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०२४-२५ या (एक वर्ष) कालावधीसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता आऊटसोर्सीग पध्दतीच्या कामाची ई-निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक निविदाधारकांनी शासनाचे www.mahatenders.gov.in व श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

१) ई-निविदा प्रसिध्दीची दि. १९/११/२०२४,
२) प्री-बीड मिटींग दि. २५/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता साई सभागृह मिटींग हॉल, शिर्डी येथे
३) ई-निविदा सादर करण्याची अंतिम दि. ०५/१२/२०२४

गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

यू ग्रो कॅपिटल लिमिटेड
चौथा मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई - ४०००७०

स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना

दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या नियम ८ आणि ९च्या परंतुकासोबत वाचावयाच्या दी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या [''प्रतिभूत मत्तांच्या''] विक्रीकरिता १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.

सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदाराला व हमीदाराला याद्वारे सूचना देण्यात येते की, यू ग्रो कॅपिटल लिमिटेड आणि पुनावाना फिनकॉर्प लिमिटेड (''प्रतिभूत धनको'') यांच्याकडे गहाण ठेवलेल्या/ भारित असलेल्या निम्नवर्णित प्रतिभूत मत्ता ज्यांचा ताबा प्रतिभूत धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, येथील निम्नोल्लेखित कर्जदार व हमीदार यांचेकडून प्रतिभूत धनकोंना देय असलेली येथील निम्नोल्लेखित देणी आणि रकमेच्या वसुलीपर्यंतचे त्यावरील व्याज व अन्य खर्च यांच्या वसुलीसाठी येथील निम्नोल्लेखित तारखेला व वेळी ''जसे आहे जे आहे'' आणि ''जसे आहे जेथे आहे'' व ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विकल्या जाणार आहेत. राखीव किंमत, इसारा रक्कम ठेव (इरठे) आणि इरठे जमा करण्याची शेवटची तारीख सुद्धा येथे खाली नमूद करण्यात आली आहेः

कर्जदारांचे/ हमीदारांचे तपशील	डिमांड नोटीसचे तपशील	लिलावाचे तपशील	
१. एक्सेल मोटर्स २. इस्रार इस्लाम खान ३. निश इस्रार खान कर्ज खाते क्रमांक : यूजीएनएसकेटीएच ००००००७२८२	सूचनेची तारीख : ११.१२.२०२३	राखीव किंमत	रु. ३९,०१,९५०/-
		इरठे	रु. ३,९०,१९५/-
	थकित रक्कम : रु. ३६,६९,९९९/- ०५.१२.२०२३ रोजीनुसार	इरठे जमा करण्याची शेवटची तारीख	०९.१२.२०२४
		लिलावाची तारीख :	११.१२.२०२४
		लिलावाची वेळ :	सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत
		वृद्धी मूल्य :	रु. १,००,०००/-

प्रतिभूत मत्तेचे वर्णन : ''नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत आणि उप नोंदणी कार्यालय नाशिक यांच्या हद्दीतील ता. व जिल्हा नाशिक, ४२२००३ नाशिक येथे स्थित, ९३१.७३ चौ.मी. क्षेत्रफळापैकी ४१८.२३ चौ.मी. क्षेत्रफळाच्या प्लॉट नं. १ए, भूमापन क्र. २५०/६/१/१ वर उभारलेल्या संतोष कॉम्प्लेक्स म्हणून ज्ञात इमारतीतील तळ मजल्यावरील ३७.९२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या, शॉप नं. ६धारण करणाऱ्या स्थावर मालमत्तेचे सर्व हिस्से आणि तुकडे. पुढीलप्रमाणे चतुःसीमित : उत्तरेला मार्जिनल स्पेस व शॉप नं. ७, पूर्वेला श्री. अकबर यांची मालमत्ता, पश्चिमेला श्री. सोनार यांची मालमत्ता, दक्षिणेला शॉप नं. ०५''

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीकरिता कृपया यू ग्रो कॅपिटल लिमिटेड/ प्रतिभूत धनको यांच्या वेबसाइटवर म्हणजेच www.ugrocapital.com मध्ये दिलेली लिंक पाहा किंवा authorised.officer@ugrocapital.com मध्ये निम्नस्वाक्षरीकारांशी संपर्क साधा.

दिनांक : १९.११.२०२४, स्थळ : नाशिक **प्राधिकृत अधिकारी, यूग्रो कॅपिटल लिमिटेड**

ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि. (आर्सिल) सीआयएन : यू६५९९९एमएच२००२पीएलसी१३४८८४ । वेबसाइट : https://auction.arcil.co.in
विविध आर्सिल न्यासांचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली
आर्सिल कार्यालय : दि रुबी, १०वा मजला, २९, सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई-४०० ०२८.
शाखा कार्यालय : ऑफिस नं. ७०४, ७वा मजला, नेपच्यून अपटाऊन, नेताजी सुभाष मार्ग, मुलुंड पोस्ट ऑफिससमोर, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल्स ६, ८ व ९ यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत ऑनलाइन ई-लिलावाद्वारा विक्रिकरिता जाहीर सूचना

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/ हमीदार/ गहाणकारांना सूचना देण्यात येते की, ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेडकडे, विविध आर्सिल न्यासांचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली (**''आर्सिल''**) (नोंदणीकृत अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा वित्तीय मत्तेच्या अभिहस्तांकनानुसार), गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या मालमत्तेची विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ (''रुल्स'')च्या रुल्स ६, ८ व ९ यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''ॲक्ट'')च्या तरतुदींनुसार याखाली वर्णिल्यानुसार पुढील व्याज, आकार व किंमत इ.सह एकत्रित थकीत देणींच्या वसुलीकरिता ऑनलाइन ई-लिलावामार्फत ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ गहाणकाराचे नाव	एलएएन नं. व सेलिंग बँक	ट्रस्टचे नाव	दिनांकित २४.०२.२०२२ सरफेसी नोटीसनुसार थकीत रक्कम	ताब्याचा प्रकार व तारीख	पाहणीची तारीख व वेळ	मालमत्तेचा प्रकार व एरिया	इसारा रक्कम ठेव (इरठे)	राखीव किंमत	लिलावाची तारीख व वेळ
ऋणको : श्री. रामनाथ शिवाजी मुंढे व श्रीमती सुनीता रामनाथ मुंढे	एलएएन नं. : २०००४१९००००९०५ सेलिंग बँक : बंधन बँक	आर्सिल - २०२४सी-००३-ट्रस्ट	रु. २०,६९,३८२.७६/- (रुपये वीस लाख एकोणसत्तर हजार तीनशे ब्याऐंशी व पैसे शहात्तर फक्त) २४.०२.२०२२ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा ०४.०८.२०२३ रोजी	१७.१२.२०२४	७६६ चौ.फू. (बिल्ट-अप एरिया व संपूर्ण मालकीची)	रु. १,३०,२२०/- (रुपये एक लाख तीस हजार दोनशे वीस फक्त)	रु. १३,०२,२००/- (रुपये तेरा लाख दोन हजार दोनशे फक्त)	२०.१२.२०२४ रोजी दु. ०३.३० वा.

लिलाव करण्यात येणाऱ्या सुरक्षित मत्तेचे वर्णन : श्री. रामनाथ शिवाजी मुंढे व श्रीमती सुनीता रामनाथ मुंढे यांच्या मालकीची मालमत्ता, सर्व्हे नं. ९/१डी/२/१५, प्लॉट नं. २२, युनिट नं. ०९ शांती केशर टाऊनशिप, हॉटेल सह्याद्रीसमोर, कीर्ति नगर, नांदगाव रोड, मौजे मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३ १०४.

आर्सिलला ज्ञात असलेले प्रलंबित वाद	काही नाही	आर्सिलला ज्ञात असलेले भार / देणी	सोसायटी देणी रोजीप्रमाणे - ज्ञात नाही
बोलीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख	त्याच दिवशी लिलावापूर्वी २ तास	बोलीवृद्धी रक्कम :	बोली कागदपत्रांमध्ये नमूद केल्यानुसार
डिमांड ड्राफ्ट यांच्या नावे बनवायचे आहेत	आर्सिल-२०२४सी-००३-ट्रस्ट	मुंबई येथे देय	
आरटीजीएस तपशील	अकाऊन्ट नं. : ५७५०००० १४१११६५, बँकेचे नाव : एचडीएफसी बँक लिमिटेड, आयएफएससी कोड : एचडीएफसी०००५४२, शाखेचा पत्ता : कमला मिल्स कम्पाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.		
संपर्क व्यक्तीचे नाव व नंबर	शैलेश गायकवाड- ९८६७९२९१२१ (shailesh.gaikwad@arcil.co.in), महेश बंगेरा- ९००४१७३२५६ mahesh.bangera@arcil.co.in), मोनिका रुद्रा दास- ९८१९८०२२८४ (monica.rudra@arcil.co.in), दीपक शिंदे- ९६३७४०८८६६ (deepak.shinde@arcil.co.in)		

शर्ती व अटी :

१. लिलाव विक्रीचे आयोजन बोली कागदपत्रांत दिलेल्या शर्ती व अटी आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आणि https://auction.arcil.co.in या वेबसाइटद्वारा ई-लिलावामार्फत करण्यात येत आहे.
२. प्राधिकृत अधिकारी (''प्रा.अ.'')/ आर्सिल हे इंटरनेट कनेक्टिव्हिटी, नेटवर्क समस्या, सिस्टम क्रॅश डाऊन, पॉवर फेल्युअर इ.करिता जबाबदार असणार नाहीत.
३. लिलावाच्या कोणत्याही स्तरावर 'प्रा.अ.' कोणतीही पूर्वसूचना न देता आणि त्याकरिता कोणतेही कारण न दाखविता लिलाव पुढे ढकलतील किंवा बोली/ प्रस्ताव स्वीकारतील/ नामंजूर करतील/ फेरबदल करतील/ रद्द करतील.
४. यशस्वी खरेदीदार/ बोलीदार कोणतीही सांविधिक देणी, कर, देय शुल्क, खरेदी विचाराधीन लागू असलेली जीएसटी, स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी शुल्क इ. सोसेल, जे लागू कायद्यानुसार त्याच्या/ तिच्या/ त्यांच्या नावे सुरक्षित मत्ता हाती सोपविणे/ वितरित करणे याकरिता आवश्यक आहे.
५. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी सांविधिक देणी इ. समाविष्ट सुरक्षित मत्तेस बाधक ठरणारे दावे/ हक्क/ देणी तसेच सुरक्षित मत्तेचा नामाधिकार, भार या संबंधित स्वतंत्रपणे/ यथावकाश चौकशी स्वतः केली पाहिजे. लिलाव जाहिरात 'आर्सिल'चे कोणतेही प्रतिनिधित्व किंवा कोणतीही बांधिलकी सिद्ध होत नाही व सिद्ध होणार नाही. 'आर्सिल'चे प्राधिकृत अधिकारी कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/ हक्क/ देणी याकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत.
६. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला लिलाव सूचनेतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकाराच्या उत्तम माहितीनुसार नमूद केलेला आहे; तथापि, निम्नस्वाक्षरीकार त्यातील कोणतीही चूक, असत्यकथन किंवा लोपन याकरिता जबाबदार असणार नाहीत.
७. ऋणको/ हमीदार/ गहाणकार, जे उक्त थकीत देणींकरिता पात्र आहेत, ते ही विक्री सूचना वर नमूद केलेल्या लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्सच्या रुल्स ८ व ९ अंतर्गत सूचना म्हणून समजतील.
८. जर वरील निर्धारित लिलावाचे आयोजन, जे काही असेल त्या कोणत्याही कारणास्तव, अयशस्वी ठरल्यास, 'आर्सिल'ला रुल्स आणि ॲक्टच्या रुल ८(५)च्या तरतुदीअंतर्गत कोणत्याही पद्धतीत सुरक्षित मत्तेची विक्री करण्याचा हक्क आहे.

स्थळ : नाशिक **स्वाक्षरी/-प्राधिकृत अधिकारी,**
दिनांक : १९.११.२०२४ **ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि.**

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९१००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर* (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.